


मिलिंद बाबर
फाऊंडर-चेअरमन, मँगो हॉलिडेज्


## जगभर फिरतांना

भाग क्रमांक : २



# रहस्यमय दक्षिण अमेरिका

**हिरव्या रंगाच्या पाण्यावर पांढऱ्या शुभ्र हजार हजार फूट उंचीच्या त्या राक्षसी हिमकड्यांमध्ये पेरलेले ते गडद निळे रंग, म्हणजे अकल्पनिय आणि अलौकिक असा अनुभव आहे आणि जेव्हा ते कडे कानठळ्या बसवणारे आवाज करीत कोसळताना दिसतात, तेव्हा आपलं आयुष्य सार्थकी लागल्याचं समाधान आणि आनंद शब्दांत व्यक्तच करता येणार नाही.**

तिवनाकु देवतेची लाल पाषाणात कोरलेली २४ फूट उंच आणि २० टन वजनाची अतिभव्य मूर्ती आहे. मूर्तीचं शिल्पकाम अत्यंत रेखीव आणि प्रमाणबद्ध आहे. परंतु ह्या जातीचा लाल पाषाण जवळपास कुठेच मिळत नाही. मग दूर कुठेतरी घडवलेली अतिभव्य आकाराची आणि प्रचंड वजनाची मूर्ती इतक्या डोंगर कपारीतून जराही धक्का लागू न देता बारा हजार फूट उंचीवरील पठारावर आणलीच कशी? ह्या मूर्तीवर जेव्हा सखोल संशोधन झालं तेव्हा त्यातून एक विलक्षण गौप्यस्फोट झाला. या मूर्तीच्या अंगावर सांकेतिक खुणांनी कोरलेली काही माहिती आढळली, जी आधुनिक उपग्रह सिद्धांताशी तंतोतंत जुळते. अतिप्राचीनकाळी, एक भला मोठ्ठा उपग्रह पृथ्वीभोवती २८८ दिवसात ४२५ प्रदक्षिणा पूर्ण करीत असे. परंतु केव्हातरी त्याच्यात काही बिघाड झाला आणि त्याचा एक मोठ्ठा तुकडा अद्याप पृथ्वीभोवती फिरत आहे आणि तोच आपला चंद्रमा. हे कसे ???

जगातील सर्वात जास्त उंचीवर (१२,५०० फूट) असलेलं व व्यावसायिक दळणवळणासाठी वापर होत असलेलं टीटीकाका एक अतिविशाल असे सरोवर आहे. एवढ्या दुर्गम आणि उंच भागातला तो समुद्रच जणू. त्याचं रहस्य काय आणि ते कसं उलगडलं?

अशा अनेक गोष्टींनी आपल्या बुद्धीला वेगळा विचार करायला लावणाऱ्या ह्या रहस्यमय दक्षिण अमेरिकेच्या शुभारंभाच्या टूरवर मी स्वतः येणार आहे. तुम्हाला ह्या रहस्यांचा मागोवा घेताना, त्यांची महत्त्वपूर्ण माहिती देण्यासाठी, हे गूढ समजावून सांगण्यासाठी आणि तुमची वैयक्तिक काळजी घेण्यासाठी.

वरील रहस्यमय गोष्टीं व्यतिरिक्त ह्या टूरवर आपण काही अद्भूत आणि अलौकिक अशी आश्चर्य पण बघणार आहोत. रहस्यमय दक्षिण अमेरिका ही केवळ एक टूर नसून, तो एक विलक्षण आणि रोमांचक असा अनुभव असणार आहे. तुमच्या वैयक्तिक पर्यटन विश्वावर चढवलेला तो मुकुटमणी असेल, हे मी तुम्हाला छातीठोकपणे सांगू शकतो.

आधुनिक सात आश्चर्यांपैकी दोन म्हणजे रियो द जनेरोचा ख्राईस्ट द रेडीमरचा डोंगरावरील अतिभव्य पुतळा आणि तेरा हजार फुटांवरील इंका संस्कृतीचा साक्षीदार माचू पिचू ह्यामध्ये आहेतच. शिवाय, आपण लहानपणापासून जिच्याबद्दल एव्हढं ऐकलं आणि वाचलं, ती, जगातील, पाण्याच्या आकारमानात, सर्वात मोठी आणि लांबीमध्ये जगातील दोन नंबरची असलेली अमेझॉन नदी, अमेझॉनचं रेन फॉरेस्ट जे जगातलं सर्वात मोठ्ठ आणि घनदाट मानलं जातं ते आणि अमेझॉनचं खोर, जिथे ह्या जंगलाच्या मधोमध एका ईको पार्क मध्ये, नदीच्या काठी दोन दिवसांचा आपला मुक्काम, आपल्याला ह्या धकाधकीच्या भौतिक आणि कृत्रिम जगापासून दूर, मानसिक शांतीची अनुभूती नक्कीच देऊन जातो. या नदीची भव्यता जर थोडक्यात सांगायची झाली तर ही नदी नसून एक नैसर्गिक चमत्कारच म्हणावा लागेल. ह्या नदीचा प्रवाह आणि खोरं इतकं प्रचंड आहे की तिला बऱ्याच वेळा समुद्राची उपमा दिली जाते. ह्या नदीची रुंदी ११कि.मी पासून ४० कि.मी. एव्हढी प्रचंड आहे. कदाचित ह्या किनाऱ्यावरच्या माणसाला पलीकडचा किनारा पण दिसणार नाही एव्हढी ही नदी, ज्या ठिकाणी ती अटलांटिक महासागराला जाऊन मिळते, तिथे तिचं पात्र जवळपास तीनशे किलोमीटर एव्हढं भव्य होतं. ह्या नदीच्या पाण्याचा प्रवाह आणि आकारमान एव्हढं प्रचंड आहे की, ती जिथे अटलांटिक महासागराला मिळते, तिथून पुढे जवळपास शंभर कि.मी. पर्यंत महासागराच्या आतमध्ये सुद्धा तिच गोड पाणी मिळू शकतं. जगात जेव्हढं गोड पाणी आहे, त्याच्या १७% पाणी एकट्या अमेझॉन नदीमध्ये आहे. ही तिची ताकद आहे. अमेझॉन नदीच्या दोन मोठ्या उपनद्या आहेत. निग्रो आणि सोलेमोस ह्या दोन नद्यांचा रंग एकदम भिन्न आहे. निग्रोचं पाणी काळसर तर सोलेमोसचं मातकट. ह्या दोन्ही नद्यांच्या पाण्याचा वेग, पाण्याचं तापमान व क्षारांच्या भिन्नतेमुळे ह्या दोन्ही नद्या एकमेकांना मिळाल्यापासून पुढे जवळपास ६ कि.मी. पर्यंत एकमेकीत न मिसळता समांतर वाहतात. पुढे त्यांनाच अमेझॉन म्हटलं जातं. ह्या दोन नद्यांचा जिथे संगम होतो, त्याला 'मिटींग ऑफ द वॉटर्स' असं म्हणतात व ते अभूतपूर्व दृश्य बघण्याची संधी आपल्याला ह्याच टूरवर मिळणार आहे.

**नाझकाच्या पठारावर असलेल्या गूढ आकृत्या आणि रेषा बघण्यासाठी आपण हवाई उड्डाण करतो, कारण त्या रहस्यमय आकृत्या आणि रेषांच्या भव्यतेची जमिनीवरून कल्पनाच येऊ शकणार नाही. चार ते पाच हजार वर्षांपूर्वी अगदीच प्राथमिक अवस्थेतील मानवांनी हे दिव्य साकारले असेल, हे आपल्या आजच्या आधुनिक मानवाच्या बुद्धीला नक्कीच पटणार नाही.**

बोलिव्हियामधील युनी येथे असलेले जगातील सर्वात मोठे मिठागर म्हणजे, जगातला सर्वात मोठ्ठा आरसा (Mirror) असंही म्हणतात. चाळीस हजार वर्षांपूर्वी आटलेले मिनचीन सरोवर म्हणजेच आजचे युनीचे मिठागर. ह्याच्यावर चालणे म्हणजे एका प्रचंड मोठ्या आरशावर चालल्यासारखे आहे. आजूबाजूच्या सर्व गोष्टी, (अगदी तुमच्या स्वतःसह सर्व) इथे परावर्तित होतात. हा एक अविस्मरणीय असा अनुभव आणि अतिशय हटके फोटो शूट करण्याची ही संधी आहे.



जगातील सर्वात मोठ्ठा समुद्र- प्रशांत महासागर (Pacific Ocean) आणि जगातील सर्वात लांब पर्वत रांग अँडीज, ह्यांच्या वळचणीतला मिरचीच्या आकाराचा देश म्हणजे चिले.

ह्या टूरच्या हायलाईट्समधला एक अविस्मरणीय अनुभव म्हणजे पातागोनिया प्रांताला भेट. हिमनदीचे स्वर्गीय दृश्य बघण्याचा हा योग. नदीचे पाणी गोठून तयार झालेली ही ३० कि.मी. लांबीची हिमनदी.

हिरव्या रंगाच्या पाण्यावर पांढऱ्या शुभ्र हजार हजार फूट उंचीच्या त्या राक्षसी हिमकड्यांमध्ये पेरलेले ते गडद निळे रंग, म्हणजे अकल्पनिय आणि अलौकिक असा अनुभव आहे आणि जेव्हा ते कडे कानठळ्या बसवणारे आवाज करीत कोसळताना दिसतात, तेव्हा आपलं आयुष्य सार्थकी लागल्याचं समाधान आणि आनंद शब्दांत व्यक्तच करता येणार नाही.

ह्या सर्व अद्भूत, अविश्वसनीय आणि अकल्पनीय अशा विलक्षण टूरमध्ये आपण काय काय बघणार आहोत त्याची ही न संपणारी यादी बघून आश्यर्यचकित व्हायला होतं.


**युरोप, साऊथ आफ्रिका आणि साऊथ अमेरिका**
**टूरसंबंधी संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी...**
**रविवार, दि. १ मार्च २०२० रोजी सायंकाळी,**
युरोप- ५.०० वा. | साऊथ आफ्रिका- ६.३० वा. | साऊथ अमेरिका- ७.०० वा.
स्थळ: तुपसाखरे लॉन, मुंबई नाक्याजवळ, **नाशिक** येथे
**मँगो हॉलिडेज्च्या मार्गदर्शन मेळाव्याला जरूर या...!**
जागा आरक्षणासाठी संपर्क : 93709 53605 / 98223 81302

रविवारी दि. १ मार्च २०२० रोजी
नाशिक ऑफिस सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत चालू राहिल.

ADVT.

**'मँगो' स्पेशल इंटरनॅशनल आणि डोमेस्टिक टूर्स**
milind@mangoholidays.in

Mango® HOLIDAYS
Experience of a Lifetime!

• पुणे : (020) 2544 4415/16/17/18 मो. : 83800 39505/83800 39499 • दादर : (022) 2433 5500/11/22/33 • ठाणे : (022) 2545 0017/18 • नागपूर : (0712) 2244557/8/9 मो. : 93709 53617 • साप्ताहिक सुट्टी : रविवार • www.mangoholidays.in •
• चिंचवड : मो.: 73870 76123 • नांदेड : मो.: 75076 77744 / 99229 75299 • नाशिक : मो.: 98220 58370 / 98223 81302 • मँगो हॉलिडेज्च्या फ्रँचायसीसाठी संपर्क मो.: 93709 53601 •